*B.S.P's*
*Gomantak Ayurveda Mahavidyalaya & Research Centre*
*Vajem, Shiroda - Goa*

## श्री कामाक्षी देवी होमीओपेथी कॉलेज आयोजित मेडीकल पॅरामेडीकल कॉलेज स्पर्धामध्ये गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्राचे नेत्रदिपक यश

शिरोडा येथील कामाक्षी देवी होमीओपेथी कॉलेजने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मेडीकल व पॅरामेडीकल विद्यालयांसांठी विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. १२ ते १५ मार्च २०१९ रोजी या स्पर्धा काराय - शिरोडा मैदानावर खेळविण्यात आल्या. विविध स्पर्धांमध्ये क्रिकेट, फुटबॉल स्ट्रायकोंग, बॅडमिंटन, बुध्दीबळ, आदिंचा समावेश होता. या स्पर्धामध्ये गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंदाला घवघवीत व नेत्रदीपक यश प्राप्त झाले आहे. क्रिकेट स्पर्धेमधे आयुर्वेद महाविद्यालयाने अंतिम सामन्यात गोवा फार्मासी कॉलेजला नमवून विजय संपादन केला. या सामन्यात आयुर्वेद कॉलेजच्या विरेंद्र प्रताप सिंग याला सामनावीर पुरस्कार प्राप्त झाला. तसेच आयुर्वेद कॉलेजचा विद्यार्थी अभिषेक जरीयाल याला मालिकेतील सर्वोत्कृष्ट फलंदाज पुरस्कार प्राप्त झाला. क्रिकेट संघाचे नेतृत्व मोहीत भारती याने केले.

क्रिकेटबरोबरच फुटबॉल स्ट्रायकींग मधेही गोमंतक आयुर्वेद महाविद्यालयच्या पुरूष व स्त्री संघाने विजेतेपद प्राप्त केले. पुरूष फुटबॉल स्ट्रायकींगचे संघाचे नेतृत्व सोनी धार याने केले तर स्त्री संघाचे नेतृत्व यास्मिन खान हिने केले. बुध्दिबळ स्पर्धेत गोमंतक आयुर्वेद महाविद्यालयच्या स्नेहील शेट्टीने व्दितीय पारीतोषिक पटकावले तर बॅडमिंटन स्पर्धेत नितिदा शुक्ला हीने व्दितीय पारीतोषिक पटकावले.

या सर्व विजेतेपदांमुळे गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंदाला मेडीकल - पेरामेडीकल स्पर्धांचे "चॅम्पियन" म्हणून घोषित करण्यात आले.

या घवघवीत यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुरा बाळे व संस्थेचे अध्यक्ष श्री. पी. के. घाटे यांनी विद्यार्थांचे अभिनंदन केले आहे.

